-

| MHKO070010462024 | दाखल तारीख – १८/०६/२०२४<br>नोंदणी तारीख – १८/०६/२०२४<br>निकाल तारीख –०२/०५/२०२६<br>कालावधी – वर्षे महिने दिवस<br>**०१ – १० – १४** |
|---|---|

==========================================

**जयसिंगपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.०२) यांचे न्यायालयात**

**( पिठासिन अधिकारी – एम.एस. पाटील यांचेसमोर )**

==========================================

**नियमित फौजदारी खटला क्रमांक. ११९/२०२४**

**निशाणी क्रमांक २४/ ब.**

**महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस स्टेशन अधिकारी,**
**जयसिंगपूर पोलीस स्टेशन,**
ता.शिरोळ, जि.कोल्हापूर
.. **अभियोगपक्ष**

***// विरूध्द //***

१) **मंथन राजेंद्र चंदुरे**,
व.व. २५, धंदा– मजुरी,
२) **अमोल राजेंद्र चंदुरे**,
व.व.२९, धंदा– खाजगी नोकरी,
३) **विजय महावीर पाटील (कटारे),**
व.व.२९, धंदा– शेती,
सर्व रा.दानोळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर
.. **आरोपी**

==========================================

**उपस्थिती –**

श्रीमती एल.एस.सदरेकर – अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील

श्री.एस.जी.जगदाळे – आरोपींतर्फे वकिल

==========================================

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | २८/०७/२०२३ |
| २. | प्रथम खबर | २९/०७/२०२३ |
| ३. | दोषारोप पत्र दाखल तारीख | १८/०६/२०२४ |
| ४. | दोषारोप तारीख | १७/०८/२०२४ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | ०४/०२/२०२५ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | ०२/०५/२०२६ |
| ७. | निकाल तारीख | ०२/०५/२०२६ |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

## आरोपीं विषयी माहिती

| अ. क्र. | आरोपींचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा |
|---|---|---|---|---|---|
| १. | **मंथन राजेंद्र चंदुरे** | आरोपी यांना सी.आर.पी.सी. ४१ अ प्रमाणे नोटीस देणेत आली आहे. | १७/०८/२०२४ | भा.दं.वि.सं.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता. |
| २. | **अमोल राजेंद्र चंदुरे** | आरोपी यांना सी.आर.पी.सी. ४१ अ प्रमाणे नोटीस देणेत आली आहे. | १७/०८/२०२४ | भा.दं.वि.सं.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता. |
| ३. | **विजय महावीर पाटील (कटारे)** | आरोपी यांना सी.आर.पी.सी. ४१ अ प्रमाणे नोटीस देणेत आली आहे. | १७/०८/२०२४ | भा.दं.वि.सं.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता. |

## फिर्यादी/बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**(अ) अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी :**

| अ. क्र | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | दिनकर शंकर घाटगे | फिर्यादी (नि.क्र.२०) |

**(ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार : निरंक.**

**(क) न्यायालया तर्फे साक्षीदार : निरंक.**

**फिर्यादी/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशाणी क्रमांक**

**(अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक :**

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | २०/अभियोग साक्षीदार क्र. १ | फिर्यादीस सहीच्या हद्दीपुरते नि.२१ देणेत येते. |

**(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी : निरंक.**

**(क) न्यायालयातर्फे निशाणी : निरंक.**

**(ड) महत्वपूर्ण वस्तू : निरंक.**

=====================================

**न्यायनिर्णय**

**(घोषित दि. ०२/०५/२०२६)**

=====================================

आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप ठेवून संपरिक्षित करण्यात आली आहे.

**अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात अशी की –**

**२.** घटना दि.२८/०७/२०२३ रोजी २१.०० वा. चे दरम्यान दानोळी ता.शिरोळ येथील खर्डेकर कॉलनी येथे फिर्यादी दिनकर घाटगे यांचे घरासमोर रोडवर घडली. फिर्यादी यांनी गेले तीन महिन्यापुर्वी आरोपी यांना एक पॅमेलीयन जातीचे क्रॉस ब्रिड कुत्र्याचे चे पिल्लु दिले असा गैरसमज करुन आरोपींनी संगनमताने फिर्यादी यांना शिवीगाळ व लाथाबुक्कांनी व दगडाने मारहाण करुन फिर्यादी यांना दुखापत केली. त्यावेळी आरोपींनी फिर्यादी दिनकर घाटगे यांना 'तु गावात सरकारवाडयाजवळ ये, तुला सोडत नाही, तुझे

तुकडे करतो' अशी धमकी देवुन तेथुन निघुन गेले. म्हणुन फिर्यादी यांनी जयसिंगपूर पो. ठाणे येथे आरोपींविरूध्द फिर्याद नोंदविली आहे.

## अन्वेषण व दोषारोप

३. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आरोपींविरूध्द जयसिंगपूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२८५/२०२३ हा दाखल झाला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान घटनास्थळ व हत्यार जप्तीचा पंचनामा केला. तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि तपासाअंती आरोपींविरूध्द पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्यानंतर त्यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरूध्द निशानी १० येथे दोषारोप निश्चित केला आहे. आरोपी यांनी निशानी ११ ते १३ वर अपराधाची कबूली दिली नाही आणि संपरिक्षेची तयारी दर्शविली. त्यानंतर अभियोग पक्षातर्फे एक साक्षीदार तपासण्यात आला. त्यानंतर फिर्यादी यांनी निशाणी १९ कडे अर्ज दाखल करुन त्यांचे व आरोपी यांचे दरम्यान आपसांत तडजोड झालेली असुन सदरचे काम तडजोड करणेस परवानगी असावी अशी विनंती केली आहे. परंतु सदरचा अर्ज नामंजूर करणेत आलेला आहे. तसेच मुळ फिर्यादी यांनी निशाणी २२ कडे पुरसीस देवुन जादा पुरावा देणेचा नाही अशी पुरसीस दिली आहे. अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, आरोपींविरूध्द अभिलेखावर गुन्हादर्शक पुरेसा पुरावा उपलब्ध न झाल्याने त्या अनुशंघाने निशाणी १ वर आदेश पारित करून आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

## मुद्दे व निष्कर्ष

५. अभियोग पक्षाचा खटला, अभिलेखावरील पुरावा यावरून माझे विचारार्थ खालील मुद्दे आले आहेत व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली ? | **नाही.** |
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यास दगडाने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली ? | **नाही.** |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपी यांनी संगनमताने फिर्यादी यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले किंवा तशा कृत्याने त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या हेतुने किंवा तसे होण्याचा संभव असलेची जाणीव असूनही त्यांना प्रक्षोभित करण्याच्या हेतूने शिवीगाळ केली ? | **नाही.** |
| ४. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले आहे काय की, आरोपी यांनी फिर्यादी यांना धमकी दिली ? | **नाही.** |
| ५. | आदेश काय ? | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते** |

**<u>कारणमिंमासा</u>**

**६.** अभियोग पक्षाने त्यांची बाजू सिध्द करण्यासाठी प्रकरणामध्ये साक्षीदार क्र. १ दिनकर शंकर घाटगे– फिर्यादी यांची साक्ष **नि.२०** वर नोंदविली आहे.

## मुद्दे क्र. १ ते ४ करीता –

७. मुद्दे क्रमांक १ ते ४ हे एकमेंकांशी निघाडीत असल्याने चर्चेची व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्दयांची कारणे एकत्रितरीत्या नोंदविण्यात येत आहेत.

८. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ फिर्यादी दिनकर शंकर घाटगे यांची साक्ष नि.२० वर नोंदविली. त्यांच्या जबाबाचे अवलोकन केले असता असे दिसून येते कि, दि.२८/०७/२०२३ रोजी काय घटना घडली होती हे त्यांना आठवत नाही. ते आरोपींना ओळखतात. त्यांना आरोपींनी मारहाण केल्यामुळे त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती अगर कसे हे त्यांना आठवत नाही. त्यांना दाखवणेत आलेल्या दि.२९/०७/२०२३ रोजीच्या फिर्यादवर त्यांची आहे. परंतु त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहिती नसल्याचे तसेच आरोपींनी त्यांना मारहाण व शिवीगाळ केलेली नव्हती असे त्यांनी कथन केले आहे. अभियोगपक्षाचा साक्षीदार हा अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे विद्वान सरकारी वकीलांनी त्यांना उलटतपाससदृश्य सुचक प्रश्न विचारले. तरीदेखील खटल्यास पूरक ठरेल अशी कोणतीही कबूली त्यादरम्यान दप्तरी मिळून आली नाही.

९. फिर्यादी व आरोपी यांनी न्यायालयात **निशाणी १९** वर अर्ज देऊन सदरचे प्रकरणात तडजोड करण्याची परवानगी मागितली. परंतु प्रस्तुत प्रकरणातील गुन्हे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३२० (१) व (२) मध्ये आपसात तडजोड न करता येण्यासारखे असल्याने फिर्यादी व आरोपी यांच्या दरम्यान झालेल्या तडजोडीला कायदेशीर मान्यता व परवानगी देण्यात आली नाही. न्यायालयाबाहेर आपआपसात त्यांनी तडजोड केल्याचे दिसते, त्यांच्या मधील क्लेश वाढु नये व त्यांच्या दरम्यान शांतता राहावी या उद्देशाने दोन्ही पक्षांनी तडजोड केल्याचे दिसते.

१०. फिर्यादी व साक्षीदार यांनी त्यांचेमध्ये व आरोपीचे दरम्यान सदरचे प्रकरण आपसात मिटले असलेचे व ते पुढे चालविणेचे नसलेचे त्यांचे एकूण पुराव्याच्या अवलोकनार्थ समजते. अभिलेखावर आलेल्या एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता, फिर्यादी व आरोपी यांच्यादरम्यानचा वाद मिटलेला दिसून येतो. मुलतः महत्वाचा साक्षीदार आभियोग साक्षीदार क्र.१ यांनी आरोपींविरूध्द फिर्यादमधील कथनातील गुन्हा शाबीत होणारा पुरावा दिला नसल्याने इतर साक्षीदार तपासणे पुरक व संयुक्तीक नसल्याने त्यांचा पुरावा नोंदविणेत आलेला नाही. मुळ फिर्यादीचा पुरावा पाहता, त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नसल्याने त्याच्या मुळ पुराव्याशिवाय इतर परिस्थितीजन्य पुराव्यास जास्त महत्व देता येणार नाही.

११. फिर्यादी यांच्या पुराव्याचे एकंदरीत अवलोकन केले असता आरोपींविरुध्द ठेवण्यात दोषारोपाबद्दल कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला दिसून येत नाही. अभियोग पक्ष यातील फिर्याद शाबित करू शकलेला नाही. अभियोग पक्षाच्या संपूर्ण पुराव्याचे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपींच्या विद्वान वकीलांचे युक्तिवाद एकत्रीतरित्या ऐकल्यानंतर आरोपींविरुध्द वर नमुद गुन्हे सबळ पुराव्याविना सिध्द होत नसल्याचे दिसून येते. प्रस्तुत आरोपी यांनी घटनास्थळी फिर्यादी यांना मारहाण केली, शिवीगाळ केली, त्या मारहाणीत फिर्यादी यांना दुखापत झाली व त्यावेळी फिर्यादी यांना त्यांनी धमकी दिली, यासर्व बाबी अभियोग पक्ष सिद्ध करू शकलेला नाही. त्यामुळे सबळ पुराव्याविना आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत केल्याचे सिध्द होत नाही. त्यामुळे मी वरील मुद्दा क्र.१ ते ४ साठी उत्तर **नकारार्थी** नोंदवत आहे.

## मुद्दा क्रमांक ४ करिता

१२. मुद्दा क्र.१ ते ४ साठी नोंदविलेली कारणमिमांसा विचारात घेता अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द गुन्हयाचे घटक सिध्द केले नसल्याने सबळ पुराव्याविना आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत केल्याचे सिध्द होत नाही. मी मुद्दा क्र. १ ते ४ चे निष्कर्ष

नकारार्थी नोंदविले आहेत. फिर्यादी व आरोपींमध्ये तडजोड झाल्यामुळे फौ.प्र.सं.कलम ३५७–अ अन्वये प्रस्तुत प्रकरणात पिडीत व्यक्तीला नुकसान भरपाई देण्यासाठी शिफारस जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, कोल्हापूर यांच्याकडे करण्यात आलेली नाही. फिर्यादी यांनी न्यायालयासमोर त्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत कोणतीही लेखी किंवा तोंडी विनंती केलेली नाही. आरोपीविरुध्द सबळ पुरावा न आल्याने आरोपीची वर नमुद गुन्हयातून निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित वाटते. सदर कामी जप्त असणारा एक हाताचे मुठीत मावले इतका दगड व एक चाकु हे मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नाश करणेत यावेत. आज रोजी आरोपी क्र. १ हा गैरहजर आहे. सदरचा आरोपी हा गु.र.नं. १०९/२०२६ मध्ये अटक असुन तो कारागृहात असलेची पुरसीस त्याचे विधीज्ञांनी निशाणी २३ कडे दाखल केली आहे. फौ. प्र. स. कलम ३५३ (६) प्रमाणे आरोपीच्या गैरहजेरीत दोषमुक्तीचा न्यायनिर्णय जाहीर करता येतो. त्यामुळे सदरकामी न्यायनिर्णय देणेस गैरवाजवी विलंब होवू नये म्हणून फौ. प्र. स. कलम ३५३ (६) प्रमाणे न्यायनिर्णय घोषित करणे योग्य हाईल. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नाही असे नोंदविले आहे. आणि मुद्दा क्र.५ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी नं.१ **मंथन राजेंद्र चंदुरे,** आरोपी नं.२ **अमोल राजेंद्र चंदुरे व** आरोपी नं.३ **विजय महावीर पाटील (कटारे)** यांची भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२३, ३२४, ५०४ व ५०६ सह ३४ या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

**२.** सदर कामी जप्त असणाराएक हाताचे मुठीत मावले इतका दगड व एक चाकु हे मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नाश करणेत यावेत.

**३.** आरोपींचे जामीन बंध पत्र रद्द करण्यात येते.

**४.** आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे प्रत्येकी

रु.१५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा जमीनकतबा द्यावा.

**५.** मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रंजना शांतीलाल सूर्यवंशी विरुद्ध जयप्रकाश तुळशीराम गुप्ता क्रिमी. अपील (एस टी ) नंबर ३९०/२०१९ या न्यायनिवाड्यात निर्देशित केलेप्रमाणे प्रस्तुत न्याय निर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांना पाठविण्यात यावी.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

PATIL MAYUR SAMPAT
Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2026.05.02 16:54:24 +0530

स्थळ – जयसिंगपूर
दिनांक – ०२/०५/२०२६

**( एम.एस. पाटील )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जयसिंगपूर
(न्यायालय क्र. ०२), ता.शिरोळ, जि.कोल्हापूर